# CASE STORY

**SIDDHESHWARI GOND BASTI, CHIKHALI ROAD, NAGPUR, DIST-NAGPUR.**

## परिचय :-




सदर वसाहत ही शहराच्या मध्य भागी असून येथे राहणारे सर्व आदिवासी गोंड समुदायाचे आहेत. या समुदायातील लोक हे बाहेरच्या घडामोडी पासून फार लांब आहेत. इथे आपण एकीकडे विकसित शहरी भाग बघतो तर हयाच  विकसित भागात कुठेतरी एक समुदाय असा आहे जो मूलभूत गरज पासून अलिप्त आहे. ही वसाहत मागील ४० वर्षा पासून येथे वास्तव्य करीत आहे. ह्यांच्या समुदयात शैक्षणिक स्तर हा आधीपासूनच खूप कमी आहे. त्याचे वास्तविक ऊदहरण येथे बघायला मिळत आहे. हा स्तर कमी असल्यामुळे हा वर्ग साऱ्या गोष्टीत मागे आहे आस दिसून आले. ही वसाहत साधारण २०० घरांची असून येथील लोकसंख्या ५००-६०० च्या जवळ जवळ आहेत. संपूर्ण वसाहत ही कच्या झोपड्या टाकून राहते. येथे मूलभूत गरजा नाही. जसे पाण्याची सोय, शौचलयाची सोय बरोबर नाही, काही शौचालय बांधून आहेत पण पाण्याची बरोबर सोय नसल्यामुळे घाण होऊन आहेत. शैक्षणिक सोय नाही, जवळपास दवाखाना नाही, सांडपाण्याची सुविधा नाही, रस्ते नाही.




## इतिहास :-

सदर वसाहत ही नागपूर येथे ४० वर्षे आधी येऊन आहे. येथील लोक हे प्रामुख्याने रायपुर, भोपाल, एमपी, छत्तीसगढ येथून कामाच्या शोधत भटकंती करीत नागपूर येथे झोपड्या टाकून राहू लागले. सुरवातीला हा समुदाय नागपूर मधील वंजारी नगर येथील मेडिकल च्या मागील भाग, पोलिस कॅाटर येथे राहत होते. काही कालावधी नंतर शासनाने ती संपूर्ण जागा ह्या समुदयाला खाली करावायला लावली. जागा शोधत ही वसाहत सिद्धेश्वर नगर, वैषनोदेवी नगर येथिल खुल्या जागेत राहू लागली. परंतु ही जागा एका झाडे बिल्डर ची असल्याने त्यांनी आधी ह्या जागेसाठी विरोध दर्शविला. काही वेळ गेल्यानंतर समझोता होऊनव काही अश्वासणे देऊन मध्य मार्ग शोधला गेला. वस्ती तर्फे बिल्डर ला ३०००-४००० रुपये महिन्याचे देण्याचे ठरविले.व त्यावर बयाना पत्र देण्याचे ठरविले. वस्ती मधील प्रत्येक परिवाराकडून ३००/- घेण्याचे ठरविले. परंतु काही परिवार पैसे द्यायचे व काही द्यायचे नाही अशी करत ही साखळी तुटली. व त्या बिल्डर ल पैसे बऱ्याच वेळा देऊ शकत नाही होतो. कालांतराने तो बिल्डर मरण पावला व त्याचे नॉमिनी येथे येऊन जागा खाली करायला दबाव देऊ लागले. बरेच भांडणे झाली. सध्या त्या बिल्डर चा मुलगा राहुल झाडे मध्ये-मध्ये येऊन शहानिशा करून शांतेतणे निघून जातो.





## शिक्षणिक स्थिति :-



वस्ती ही शहराच्या मध्यभागी जरी असली तरी शिक्षणिक प्रमाण हे नाही च्या बरोबर आहे. सांगायला वस्ती मधील पोर शाळेला जातात ८ वा १० वा वर्ग पास झालेत तरीही त्यांना लिहिता वाचता येत नाही. तसेच वस्ती ला लक्षात घेता येथे बऱ्याच शाळा व संस्था येतात काम करायला. म.न.पा शाळेतील शिक्षक वर्ग येतो शाळा बाह्य विद्यार्थी शोधायाला व मुले दिसली कि आपल्या शाळेला मुलांची नाव नोंदवून घेऊन जातो. पालक वर्ग आशेणी पोरला शाळेत पाठवतो. एका शाळेतून शिकत असताना मुलगा किंवा मुलगी मोठी झाली तरीही त्याला लिहिता वाचता येत नाही म्हनून दुसऱ्या शाळेनि विचारले तर परत त्या मुलाला मुलीला दुसऱ्या शाळेत पाठविले जाते. म्हणजे एकाच विद्यार्थीचे नाव एका वेळी दोन शाळेत असते.

वस्ती मध्ये सध्या "सेवा सर्वदा बहुउद्देशीय संस्था" शिक्षणावर काम करत आहेत. वस्ती शाळा साधारणतः २-३ महीने पासून सुरू आहे. हेतु फक्त जे विदहयार्थी आहेत त्यांना लिहिता वाचता याव. कारण मुले शाळेत जातात परंतु त्यांना लिहिता वाचता येत नाही. तसेच त्यांच्या साठी वस्ती मध्ये तीन शेड टाकून शाळा सुरू करण्याचे काम सुरू आहे.

जे मुले ९-१० शिकून झाले आहेत त्यांना काहीच लिहिणं वाचना येत नसल्यामुले वस्ती मधील परिवारांचा सुद्धा शाळे मध्ये मुलाना पाठवण्यावर विश्वास राहला नाही आहे. सध्या शाळा सुरू झाल्या आहेत. तरीही वस्ती मध्ये मनपा चे शिक्षक येत आहेत. काही शाळा वस्ती मध्ये गाडी पाठवतात. परंतु त्यांची वेळ नक्की नसते. म्हणजे १० ची शाळा असते परंतु गाडी पोरान घ्यायला १२-१ ल येते. असे निदर्शनात आले.

## सामाजिक परिस्थिती :-



एकंदरीत पाहता वस्ती मधील पुरुष वर्ग हा गड्डे खुदाई, झाड कापणे इत्यादि कामाला जात असतो. त्यांची रोजी सुद्धा २००-३०० पर्यन्त असते. त्यातच कधी काम असते कीवा कधी काम नसते. आर्थिक परिस्थित ही अतिशय कमकुवत आहे. त्यामुळे त्याचा प्रभाव प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रित्या त्यांचा राहणी मनावर पडताना दिसत आहे. त्यामुळे ते सामाजिक कार्यक्रमात सहसा भाग घेत नाहीत. ते फक्त त्याच्या समुदाया पुरतेच सहभागी होतात. वस्ती मध्ये १००% लोकांचे राहणीमान खालवलेल आहे. त्यांचे घर हे कच्च्या प्रकारच्या झोपड्यांचे आहेत. नळाच्या एकही सुविधा नाही. परंतु सध्या स्थितीत २ हापस्या आहेत. एकला पानी येते व दुसऱ्याला पानी कमी आहे. सांडपाण्याची सुविधा नसल्याने घानीचे साम्राज्य आहे. पानी जायला गदार नाल्या नाहीत. पावसाचे पानी खूप साचून ते त्याच्या घरात जाते. त्यामुळे त्य पाण्यासोबत घाणीतले किडे व मेंडक, सांप इत्यादि प्रकार घरात येतात, घरात त्यामुळे लहान मुलाना धोका होतो. आणि त्याच घाणीच्या किंवा साचलेल्या पाण्याच्या ठिकाणी हया हापस्या आहेत. आणि त्या ठिकाणी वस्ती मध्ये रास्ता नाही. त्यामुळे पावसाचे पानी साचले तर ये जा करणे कठीण होते. पावसामुळे कित्येक जणाच्या झोपड्या हया तुटून पडतात.

घरातील परिस्थिति बिकट असल्यामुळे धान्य रोजचे रोज त्यांना लागेल तेवढे आणावे लागते. घरात अन्न शिजत नाही म्हणून वस्ती शेजारील किराणा दुकान मधून धान्य घेऊन १ हांडी पानी घ्याव लागते.



वस्ती मध्ये संडासची सुविधा केलेली आहे. पाण्या अभावी ते घाण होऊन कोनीही त्याचा वापर करीत नाही. सरकारी सेवक साफ करायला पाण्याच्या गड्या घेऊन येतात व साफ करताना फोटो काढून परत पानी वापस घेऊन जातात (स्थानिकांच्या मतानुसार) . त्यामुळे काही जन हे वस्तीच्या शेजारी खुल्या जागे मध्ये जातात.



वस्ती मध्ये मूला मुलीचे लहान वयातच म्हणजे १३-१४ वर्षे वयातच होते. तसेच त्यांच्या मध्ये कुटुंब नियोजनाची जनजागृती नाही आहे. एकच मुलीला ३-४ मुले आहेत. लहान वयातच व्यसनाधीन मुले आहेत.

एका कुटुंबाचे २-३ परिवार वेगवेगळे आजू बाजूला वेगवेगळ्या झोपड्या टाकून राहतात. त्यामुळे झोपड्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्यांचा कडे मूलभूत कागदपत्रे नाही आहे. आणि ती कागदपत्र तयार व्हायला निदान बर्थ सर्टिफिकेट ची गरज असते. कागदपत्रे नसल्यामुळे शासनाच्या योजनांचा फायदा त्यांना घेत येत नाही आहे.

वस्ती मधील बहुतांश आदिवासी समाज हा ख्रिश्चन धर्मात परिवर्तीत होत आहे.

वस्ती मध्ये परिवार वाढत आहेत परंतु बरीच जणांकडे रेशन कार्ड नाहीत. मोजके ९०-९५ केशरी कार्ड धारक रजिस्टरर्ड आहेत(रेशन दुकांदाराच्या मते). नवीन परिवार जे आहेत त्यांचे रेशन कार्ड नाही आहेत. त्यमुले ते धान्य दुकानातून लाभ घेऊ शकत नाही. रेशन दुकानातून धान्य परात्री बरोबर सहयोग मिळत नाही. काही कार्ड धारक असे आहेत ज्याना आजूनही एक दा पण धान्य मिळालेले नाही.

## आर्थिक परिस्थिति :-



वस्ती मधील सर्व पुरुष वर्ग हा मानेवाडा येथील कामगार ठिय्या वर कामाच्या शोधासाठी जात असतात. महिला वर्ग हा केटरींग च्या कामाला म्हणजे भांडी धुनी च्या कामाला जातात. परंतु अगदी बोटावर मोजन्या इतक्याच महिला कामाला जातात. त्यातही रोजी कमी पण कामाची वेळ जास्त. बऱ्याच वेळा पूर्ण रात्र निघून जाते परंतु रोजी ही स्थायी म्हणजे ३००-३५० रुपये एवढीच मिळत असते.

आर्थिक स्थिति फार कमकुवत आहे. कुठल्याच गोष्टीचे प्रशिक्षण नाही त्यामुळे त्यांना दूसरा रोजगार मिळत नाही. आर्थिक बाजू कमजोर असल्याने त्यांच्या खाण्या पिण्यावर, राहणीमानावर सुद्धा परिणाम होतो. त्याचा परिणाम आरोग्यावर, शिक्षणावर सुद्धा होतो.

## आरोग्यविषयक परिस्थिति :-





वस्तिची हालत पाहता त्याचा परिणाम राहणाऱ्या लोकांवर होत आहे. आजच्या आधुनिक युगात सुद्धा ह्या वस्ती मध्ये महिला ह्या घरीच आया च्या हाताने प्रसूती करतात. आणि काही तत्काळ परिस्थिति आली टर तेव्हाच त्या दवाखान्याकडे आपले पाय वळवतात . परंतु त्या दवाखान्यात जायला मागे पुढे बघतात. घरी प्रसूती होत असल्याने बऱ्याच वेळेला त्या बर्थ सर्टिफिकेट मिळाऊ शकत नाही. काही जे तत्पर असतात ते जाऊन काढून आणतात. त्यमुले वस्ती मधील बऱ्याच लोकाना त्यांचे वय माहीत नाही. त्यांचा कडे  बर्थ सर्टिफिकेट नाही आहे. आवश्यक कागदपत्रे नसल्यामुळे त्यांना आरोग्य विषयक सुविधांचा लाभ घेत येत नाही. सध्या काही मुली ह्या गरोदर आहेत. परंतु त्या मातृत्व योजणेचा लाभ घेऊ शकत नाही, कारण त्यांचा कडे साधे जी आवश्यक कागदपत्रे नाही आहे.

बरीच लहान मुले ही बिना लसीची आहे. त्यांचा जवळ पास आंगणवाड्या नाही. त्यामुळे त्यांचे वजन, वय काय आहे ह्याची कल्पना सुद्धा नाही. जवळपास सरकारी दवाखाना नाही त्यामुळे ते घरीच उपाय करतात. पैशाच्या अभावी ते प्रायवेट दवाखान्यात जाऊ शकत नाही. वस्ती मध्ये काही परिवारात सिकलसेल चे रुग्ण दिसून येत आहेत. ते पण अगदी लहान वयाच्या मुलांमध्ये (११-१४ वर्षे). व ते सध्या प्रमाण वाढत चालले आहे(स्थानिकांच्या मतानुसार).









## गंभीर बाबी:-

१- ह्या लोकांकडे मालकीचे जमिनीचे कागदपत्रे नाही आहे, बिल्डर नि ह्यांच्या कडून पैसे घेतले आहे.

२- येथील मुले मुली कमी वयातच लग्न करतात.

३- येथे जास्तीत जास्त प्रसुत्या घरीच होतात.

४- पिण्याच्या पाण्याची सोय नाही .२००-३०० मीटर वरुण महिला ह्या हपसी वरुण पानी आणतात.

५- इथे वस्ती शाळा आहे. शाळा बाह्य मुले खूप आहेत

६- ८-९ वर्ग शिकून मुले आहेत. परंतु त्यांना लिहिता वाचता येत नाही.

७- येथील लोकांकडे आवश्यक कागदपत्रे नाही आहे म्हणून त्यांना रेशन कार्ड, आधार कार्ड, बँक खाते, योजनांचा लाभ घेत येत नाही.

८- वस्ती मध्ये गटार, नाल्या नाहीत.

९- वस्ती मध्ये मोबाइल टॉयलेट आहेत परंतु पाण्या अभावी तिथे स्वच्छता कोणीही करत नाही. शशाणाचे कर्मचारी सुद्धा या कडे दुर्लक्ष करतात.

१०- अस्वच्छता खूप जास्त प्रमानात आहे.

११- बऱ्याच मुलांचे लसीकरण झाले नाही.

१२- कुटुंबनियोजन संबंधी जन जारूती महिला पुरुष मध्ये नाही.

१३- लहान वयातच महिला ह्या ३-४ वेळा गरोदर होत आहेत.

१४- पुरुषप्रधान संस्कृति आहे.

१५- महिलाना पुरुषांसामोर जास्त बोलायची मुभा नाही.

१६- ह्या वस्तीचे स्वरूप अतिशय बेकार रूपात आहे. इथे साधारणतः चालणे सुद्धा अवघड आहे

१७- महिला, बालक, पुरुष यांच्या मध्ये स्वच्छता नाही आहे.

१८- लहान लहान मुले व्यसनाधीन आहे.

१९- एकच मुलाचे नाव २-२ शाळेला आहे.

२०- अर्ध्या लोकांकडे रेशन कार्ड नाही आहे.



**माहिती संकलन - युवा रुरल असोसिएशन, नागपूर**